महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/विवि/हिवाळी सुट्टी २०२२-२३/२०२३/ २२० दिनांक ११.०१.२०२३.

11 JAN 2023

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील
शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित तंत्रनिकेतने
व इतर तत्सम पदविका संस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील हिवाळी सुट्टी बाबत..**
संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक
क्र. १०/एडीएम/हिवाळी सुट्टी २०२२-२३/२०२२/१७ दिनांक ०६.०१.२०२३.

सोबत संदर्भिय परिपत्रक जोडण्यात येत आहे. सदर परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या संस्थेत कार्यरत पात्र शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) यांच्या हिवाळी सुट्टीबाबत कार्यवाही करावी.

सोबत : संदर्भिय परिपत्रक.

(मारुती रा. जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://www.dte.maharashtra.gov.in

परिपत्रक क्रमांक : १०/एडीएम/हिवाळी सुट्टी २०२२-२३/२०२२/ १८ दिनांक : 6 JAN 2023

विषय: शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील हिवाळी सुट्टी बाबत....

संदर्भ : १) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.मरातंशिमं/का-५१/हिवाळी सुट्टी/२०२२/८४४९, दि.२७/१२/२०२२
२) मंडळाचे शैक्षणिक वेळापत्रक क्र.MSBTE/D-४०/Academic Calender/Revised २०२२/२४१, दि.२१/९/२०२२

सर्व शासकीय व शासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका संस्थांमधील (स्वायत्त तंत्रनिकेतनांव्यतिरिक्त इतर) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षी २० दिवस हिवाळी सुट्टी व ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात येते.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रांन्वये प्रस्तावित केल्यानुसार पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षेच्या कामासाठी, मंडळस्तरावरील कामकाजासाठी तसेच "स्कूल कनेक्ट" उपक्रम राबविण्यासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग थोपवून दि.१०/१/२०२३ ते दि. २९/१/२०२३ पर्यंत एकूण २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात यावी.

परीक्षा व मंडळस्तरावरील कामकाज या महत्वाच्या कामासाठी ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना थांबविण्यात येईल ते उपरोक्त नमूद कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असेही कळविण्यात येते की, संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्गाकडून सदर कामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे ही संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पुर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या कामासाठी लागणारा अधिकारी/कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, सदर सुट्टी २० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१) प्राचार्य,शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित तंत्रनिकेतने/ इतर तत्सम पदविका संस्था (विभागीय कार्यालयामार्फत)
२) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, वांद्रा (पु.), मुंबई-५१.
३) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/नाशिक/पुणे.
४) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद/मुंबई/नागपूर/पुणे.
५) कार्यासन क्रमांक २, २ अ, ४, ४अ, १२, मुख्य कार्यालय, मुंबई.
६) का.क्र.३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

*E/Bhadekar/Circular Vacation 2022-23 Winter*